ePaper

## महिला आरक्षणाला परिसीमनची अट कशाला?; राहुल गांधींचा हल्लाबोल



वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827

# महाईन्यूज ™

WWW.MAHAENEWS.COM | रविवार, दि. 09 ऑगस्ट 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!



पान 3 वरुन...

सहा महिन्यांत मोशीचा कचऱ्याचा डोंगर गायब करा!


## विधेयकाला कायमच विरोध; स्टॅलिन यांच्या 'डीएमके' ची ठाम भूमिका

# सीमांकन विधेयकात 'ट्विस्ट'

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**सीमांकन आणि महिला आरक्षण विधेयकावरून तामिळनाडूतील प्रमुख विरोधी पक्ष डीएमकेने आपली भूमिका स्पष्ट केली आहे. पक्षाने सुरुवातीपासून या विधेयकाला विरोध केला असून, यापुढेही विरोध कायम राहील, असे पक्षाचे नेते आणि माजी उपमुख्यमंत्री उदयनिधी स्टॅलिन यांनी स्पष्ट केले. त्यामुळे डीएमके विधेयकाला पाठिंबा देईल, अशी मागील काही दिवसांपासून सुरू असलेली चर्चा थांबली आहे.**





### डीएमकेचे तळ्यात मळ्यात, पाठिंब्याचे दिले होते संकेत

एप्रिल महिन्यात काँग्रेससोबत खांद्याला खांदा देत या विधेयकाला विरोध करणारी डीएमके संसदेत अलीकडे विधेयकावर तळ्यात मळ्यात करत होती. विधेयकावरील आपली भूमिका नरम करण्याचे डीएमकेचे संकेत होते. अनेक दशके काँग्रेससोबत युतीमध्ये असलेल्या डीएमकेला थलपती विजय यांच्या विजयानंतर सध्या बाजूला सारल्यासारखे वाटत आहे. त्यामुळे जेव्हा केंद्र सरकारने हे विधेयक संसदेत पुन्हा मांडण्याचे संकेत दिले तेव्हा डीएमकेनेही आपली भूमिका नरम केली. सरकारने तीन दुरुस्त्या केल्यास विधेयकाला पाठिंबा देण्याची शक्यता डीएमकेने वर्तवली आहे. डीएमकेचे लोकसभेत २२ आणि राज्यसभेत आठ खासदार असल्याने त्यांचा पाठिंबा अधिक महत्त्वपूर्ण आहे.

### डीएमकेच्या ३ मागण्या काय होत्या?

या विधेयकाद्वारे २०११ च्या जनगणनेच्या आधारे मतदारसंघ पुनर्रचना करून लोकसभेच्या जागांची संख्या ५४३ वरून ८५० पर्यंत वाढवण्याचे सरकारचे उद्दिष्ट आहे. सरकारने पुढील २५ वर्षांसाठी मतदारसंघ पुनर्रचना २०११ च्या जनगणनेऐवजी १९७१ च्या जनगणनेच्या आधारावर करावी अशी डीएमकेची इच्छा आहे. त्याशिवाय सर्व राज्यांमधील जागा ५० टक्क्यांनी वाढवाव्यात ही पक्षाची दुसरी मागणी होती. तिसरी अट म्हणून प्रस्तावित मतदारसंघ पुनर्रचनेत प्रत्येक राज्यातील किती जागा वाढवल्या जातील हे संसदेत सादर होणाऱ्या विधेयकात स्पष्टपणे नमूद करावे अशी डीएमकेची मागणी होती.

इंडिया आघाडीपासून वेगळे झाल्यानंतर डीएमकेला सोबत घेण्याचे भाजपाकडून प्रयत्न सुरू असल्याची चर्चा होती. सीमांकन विधेयकाला पाठिंबा देऊन डीएमके आणि भाजपामध्ये जवळीक निर्माण होण्याची शक्यताही व्यक्त केली जात होती. मात्र, उदयनिधी यांच्या भूमिकेमुळे या चर्चांना पूर्णविराम मिळाला आहे.

उदयनिधी स्टॅलिन यांनी सांगितले की, "आम्ही सुरुवातीपासून या विधेयकाला विरोध करत आलो आहोत आणि यापुढेही आमचा विरोध कायम राहील. हा कुठला नवीन मुद्दा नाही. डीएमकेने कायम सीमांकन विधेयकाला विरोध केला आहे." मुख्यमंत्री विजय यांच्यासोबत सुरू असलेल्या राजकीय संघर्षाच्या पार्श्वभूमीवर त्यांनी ही भूमिका स्पष्ट केली.

दरम्यान, राहुल गांधी यांनीही तामिळनाडूत असताना या विधेयकाला सर्व राष्ट्रीय आणि प्रादेशिक पक्षांनी विरोध करण्याचे आवाहन केले होते. विधेयकाला पाठिंबा देणाऱ्यांना तामिळनाडूच्या जनतेसोबत विश्वासघात केल्यासारखे मानले जाईल, असा इशारा त्यांनी दिला होता.

एप्रिलमध्ये काँग्रेससोबत या विधेयकाला विरोध करणाऱ्या डीएमकेकडून अलीकडे भूमिका नरम होण्याचे संकेत मिळाले होते. सरकारने तीन दुरुस्त्या केल्यास विधेयकाला पाठिंबा देण्याची शक्यता पक्षाने व्यक्त केली होती. डीएमकेचे लोकसभेत २२ आणि राज्यसभेत आठ खासदार असल्याने त्यांची भूमिका महत्त्वाची मानली जाते.

डीएमकेच्या प्रमुख मागण्यांमध्ये २०११ ऐवजी १९७१ च्या जनगणनेच्या आधारे मतदारसंघ पुनर्रचना करणे, सर्व राज्यांतील लोकसभा जागा ५० टक्क्यांनी वाढवणे आणि प्रत्येक राज्यातील वाढीव जागांचा स्पष्ट तपशील विधेयकात नमूद करणे यांचा समावेश होता.

सरकारकडून २०११ च्या जनगणनेच्या आधारे मतदारसंघ पुनर्रचना करून लोकसभेच्या जागांची संख्या ५४३ वरून ८५० पर्यंत वाढवण्याचे उद्दिष्ट असल्याचे सांगितले जात आहे. उदयनिधी यांच्या ताज्या भूमिकेमुळे सीमांकन विधेयकावरून केंद्र आणि तामिळनाडूतील राजकीय संघर्ष पुन्हा तीव्र होण्याची शक्यता आहे.

# तुषार गेला... अन् घराचा आधारच हरपला!

## अपघाताची बातमी कानी पडताच वाकड सुन्न; हजारोंच्या उपस्थितीत लाडक्या तुषारला अखेरचा निरोप

**महाईन्यूज । पुणे**

**मुंबई-पुणे एक्सप्रेसवेवरील मिसिंग लिंक बोगद्यात शुक्रवारी पहाटे झालेल्या भीषण अपघातात वाकडमधील युवा उद्योजक व सामाजिक-राजकीय क्षेत्रात सक्रिय असलेले तुषार वामन भूमकर यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. फॉर्च्युनर कारमधून मित्रांसोबत पुण्याहून मुंबईच्या दिशेने जात असताना त्यांच्या कारची पुढे जाणाऱ्या मालवाहू टेम्पोला पाठीमागून जोरदार धडक झाली. धडक एवढी भीषण होती की, तुषार यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला.**

तुषार यांच्या निधनाची बातमी वाकड परिसरात पोहोचताच शोककळा पसरली. हसतमुख, उत्साही आणि सर्वांशी आपुलकीने वागणारा तरुण म्हणून त्यांची ओळख होती. सामाजिक व राजकीय क्षेत्रातही ते सक्रिय होते. त्यांच्या अचानक जाण्याने भूमकर कुटुंबीयांसह मित्रपरिवार, नातेवाईक आणि परिसरातील नागरिकांना मोठा धक्का बसला.

लहानपणीच तुषार यांच्या डोक्यावरून वडिलांचे छत्र हरपले होते. आई आणि मोठ्या बहिणींच्या आधाराने त्यांनी संघर्ष करत आयुष्य उभे केले. शेतकरी कुटुंबातून पुढे येत त्यांनी हॉटेलसह विविध व्यवसायांत स्वतःचे स्थान निर्माण केले. संसार फुलवून दोन मुलांच्या उज्ज्वल भवितव्याची स्वप्ने त्यांनी पाहिली होती. मात्र, नियतीच्या एका घावाने पत्नीचा जीवनसाथी, आईचा आधार आणि दोन मुलांचा पिता कायमचा हिरावून घेतला.

### ‘आमचा आधार गेला...’

लहानपणीच वडिलांचे छत्र हरपलेल्या तुषार भूमकर यांनी संघर्षातून कुटुंबाचा आधार बनत स्वतःचे आयुष्य उभे केले. मात्र, नियतीच्या घावाने आईचा आधार, पत्नीचा जीवनसाथी आणि दोन मुलांचे वडील कायमचे हिरावले. तुषार यांच्या पार्थिवाजवळ बहिणींचा ‘वडील लवकर गेले, देवाने तुषारलाही नेले...’ असा आक्रोश उपस्थितांचे काळीज पिळवटून टाकणारा ठरला.

तुषार यांच्या पार्थिवाचे अंत्यदर्शन घेताना आई आणि बहिणींचा आक्रोश उपस्थितांचे काळीज पिळवटून टाकणारा होता. ‘वडील लवकर गेले, देवाने तुषारलाही नेले... आमचा आधार गेला,’ असे म्हणत बहिणींनी केलेला आक्रोश ऐकून उपस्थितांचेही डोळे पाणावले. कुटुंबाचा आधार असलेल्या तुषार यांच्या अकाली निधनाने आई, पत्नी, दोन मुले आणि बहिणींवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

शुक्रवारी वाकड येथील स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. वाकड, पुनावळे, पिंपळे सौदागर, हिंजवडी, थेरगाव, काळेवाडी तसेच शहराच्या विविध भागांतून राजकीय, सामाजिक क्षेत्रातील व्यक्ती, नातेवाईक, मित्रपरिवार आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. विशेषतः तरुणांची लक्षणीय उपस्थिती होती. डोळ्यांत अश्रू आणि मनात असंख्य आठवणी घेऊन वाकडकरांनी आपल्या या उमद्या तरुणाला अखेरचा निरोप दिला.



### दोन मुलांच्या डोक्यावरचे छत्र हरपले

मिसिंग लिंक बोगद्यातील भीषण अपघातात तुषार भूमकर यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. आईचा आधार, पत्नीचा जीवनसाथी आणि दोन मुलांचे वडील अचानक हिरावल्याने भूमकर कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला. हजारोंच्या उपस्थितीत अश्रूंनी तुषार यांना अखेरचा निरोप देण्यात आला.

# सीसीटीव्हीने दाखवला रस्ता, ई-चलनाने पोहोचवले लुटारूंपर्यंत!

**महाईन्यूज । पुणे**

**पुणे-अहिल्यानगर रस्त्यावर मोटार अडवून व्यावसायिकावर देशी बनावटीच्या पिस्तुलातून गोळीबार करत त्याच्याकडील २२ तोळे सोन्याचे दागिने लुटणाऱ्या तिघांना पुणे पोलिसांनी मध्य प्रदेशातील उज्जैन परिसरातून अटक केली. गुन्हे शाखेच्या दरोडा व वाहन चोरी प्रतिबंध विभागाने तांत्रिक तपासाच्या आधारे आरोपींचा माग काढत ही कारवाई केली. आरोपींकडून तीन देशी बनावटीची पिस्तुले आणि सोन्याचे दागिने जप्त करण्यात आले आहेत.**

अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे अविनाश किशनचंद त्रिपाठी (४३), सुरेंद्रपाल रामचंद्र पाल (३२) आणि मोहम्मद शोएब वसीम खान (३७) अशी आहेत. तिघेही उत्तर प्रदेशातील रहिवासी असून, त्रिपाठी हा सध्या बकोरी परिसरात राहत होता.

५ ऑगस्ट रोजी रात्री साडेआठच्या सुमारास पुणे-अहिल्यानगर रस्त्यावरील शिरसवाडी परिसरातून एक व्यावसायिक त्याच्या भावासोबत मोटारीतून जात होता. त्यावेळी आरोपींनी त्यांची मोटार अडवली. त्यानंतर मोटारचालकावर देशी बनावटीच्या पिस्तुलातून गोळीबार करून त्याच्याकडील २२ तोळे सोन्याचे दागिने लुटले आणि आरोपी दुचाकीवरून पसार झाले.

घटनेनंतर लोणीकंद पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन गुन्हे शाखेच्या दरोडा व वाहन चोरी प्रतिबंध विभागाने तपास सुरू केला. परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले असता आरोपी दुचाकीवरून पसार झाल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले.

तांत्रिक तपासातून आरोपी मध्य प्रदेशातील उज्जैन परिसरात असल्याची माहिती मिळाल्यानंतर पुणे पोलिसांचे पथक तातडीने उज्जैनला रवाना झाले. शुक्रवारी पोलिसांनी तिन्ही आरोपींना उज्जैन परिसरातून ताब्यात घेतले. आरोपींना स्थानिक न्यायालयात हजर करण्यात आले. न्यायालयाने त्यांची प्रवासी कोठडी मंजूर केली असून, तिन्ही आरोपींना घेऊन पोलिसांचे पथक पुण्याकडे रवाना झाले आहे.



### जुन्या ई-चलनाने दिला आरोपींचा सुगावा

सीसीटीव्हीमध्ये दिसणाऱ्या दुचाकींचे क्रमांक तपासताना एका दुचाकीवर यापूर्वी दंडात्मक कारवाई झाल्याचे पोलिसांना आढळले. पोलिसांनी त्या दुचाकीवरील जुन्या ई-चलनाची माहिती तपासली असता आरोपींपैकी एकाचे नाव समोर आले. याच धाग्यावरून पोलिसांनी पुढील तपास करत आरोपींचा माग काढला.

# सहा महिन्यांत मोशीचा कचऱ्याचा डोंगर गायब करा!

## आयुक्तांचे आदेश; सप्टेंबरमध्ये ७०० टन क्षमतेचा वेस्ट टू एनर्जी प्रकल्प सुरू करण्याचे नियोजन

**महाईन्यूज** | पिंपरी-चिंचवड

**पिंपरी-चिंचवड शहरातील वाढत्या कचरा समस्येवर महापालिकेने उपाययोजनांना वेग दिला आहे. मोशी कचरा डेपोतील वेस्ट टू एनर्जी प्रकल्पातील चिमणी बदलण्याचे काम अंतिम टप्प्यात असून, सप्टेंबरच्या मध्यापर्यंत प्रकल्प पुन्हा कार्यान्वित होण्याची शक्यता आहे. प्रकल्प सुरू झाल्यानंतर दररोज सुमारे ७०० टन सुक्या कचऱ्यावर प्रक्रिया करून वीज निर्मिती केली जाणार असल्याची माहिती महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी दिली.**



मोशी कचरा डेपो परिसरातील वेस्ट टू एनर्जी प्रकल्पातील अनधिकृत प्रशासकीय इमारत कोसळून ८ जुलै रोजी नऊ कर्मचाऱ्यांचा मृत्यू झाला होता. या दुर्घटनेनंतर मोशी डेपोमध्ये कचरा डंप करण्याची प्रक्रिया बंद करण्यात आली. त्यामुळे शहरातील विविध भागांत कचरा साचण्याचे प्रमाण वाढले असून, नागरिकांच्या तक्रारीही वाढल्या आहेत.

प्रकल्पातील धुरड्याची नवीन चिमणी बसविण्याचे काम सुरू असून, ते महिनाभरात पूर्ण करण्याचे नियोजन आहे. त्यानंतर सप्टेंबरच्या मध्यापर्यंत प्रकल्प सुरू केला जाणार आहे. प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर दररोज ७०० टन सुक्या कचऱ्यावर प्रक्रिया करणे शक्य होणार आहे.

मोशी कचरा डेपोमध्ये कचरा साठवण्यासाठी आता पुरेशी जागा उपलब्ध नसल्याचे महापालिका प्रशासनाने स्पष्ट केले आहे. त्यामुळे शहरातील अन्य ठिकाणी दररोज १ हजार टन क्षमतेचा नवीन वेस्ट टू एनर्जी प्रकल्प उभारण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

दरम्यान, मोशी डेपोतील जुन्या कचऱ्याचा डोंगर कमी करण्यासाठी बायोमायनिंग प्रक्रिया वेगाने राबविण्यात येत आहे. सध्या दररोज सुमारे ५ हजार टन कचऱ्यावर प्रक्रिया केली जात आहे. संबंधित ठेकेदाराला मुदतवाढ देऊन मनुष्यबळ व यंत्रसामग्री वाढविण्यात आली असून, पावसाळ्यातही काम सुरू ठेवण्यात आले आहे.

पुढील सहा महिन्यांत मोशी डेपोतील कचऱ्याचा डोंगर पूर्णपणे हटविण्याचे आदेश देण्यात आले आहेत. हे काम पूर्ण झाल्यानंतर डेपो परिसरातील सुमारे २५ एकर जागा मोकळी होणार आहे.

शहरातील कचरा वाहतूक आणि प्रक्रिया व्यवस्थेवरील ताण कमी करण्यासाठी महापालिकेने विकेंद्रित कचरा व्यवस्थापनाचे नियोजन केले आहे. शहरातील १० क्षेत्रीय कार्यालयांच्या अंतर्गत कचरा प्रक्रिया केंद्रांसाठी सुमारे ४० जागा निश्चित करण्यात आल्या आहेत. स्थानिक पातळीवर कचऱ्यावर प्रक्रिया केल्यास वाहतूक खर्च कमी होण्यासह एका ठिकाणी मोठ्या प्रमाणात कचरा साठण्याची समस्या कमी होणार आहे.

सध्या पिंपरी-चिंचवडमध्ये दररोज सुमारे १ हजार ५०० टन कचरा निर्माण होतो. भविष्यात हे प्रमाण ५ हजार टनांपर्यंत वाढण्याची शक्यता असल्याने महापालिकेने दीर्घकालीन कचरा व्यवस्थापनाचे नियोजन सुरू केले आहे.

कासारवाडीतील शंकरवाडी परिसरातील खडकी कॅन्टोन्मेंट बोर्डाच्या सुमारे ४० एकर जागेपैकी २० एकर जागा कचरा प्रक्रिया केंद्रासाठी उपलब्ध करून देण्याचा प्रस्ताव संरक्षण विभागाकडे पाठविण्याचे महापालिकेचे नियोजन आहे.

### मोशीचा कचऱ्याचा डोंगर हटणार!

मोशी कचरा डेपोतील जुन्या कचऱ्यावर बायोमायनिंगद्वारे दररोज सुमारे ५ हजार टन कचऱ्यावर प्रक्रिया केली जात आहे. पुढील सहा महिन्यांत कचऱ्याचा डोंगर पूर्णपणे हटविण्याचे आदेश देण्यात आले असून, त्यानंतर सुमारे २५ एकर जागा मोकळी होणार आहे.

# रॉंग साईडचा धुमाकूळ; पीएमपी बसचालकांची कसरत

**महाईन्यूज** | पिंपरी-चिंचवड

**पिंपरी-चिंचवड शहरातील अनेक चौकांमध्ये दुचाकीस्वार आणि रिक्षाचालकांकडून रॉंग साईडने वाहन चालविले जात असल्याने वाहतुकीचा खोळंबा होत आहे. विरुद्ध दिशेने अचानक वाहने समोर येत असल्याने मोठ्या पीएमपी बसचालकांना वाहन थांबवून मार्ग मोकळा करावा लागत आहे. त्यामुळे वाहतुकीचा वेग मंदावून कोंडी होण्यासह अपघाताचा धोकाही वाढला आहे.**




मोठ्या पीएमपी बसला चौकातून वळण घेताना विशेष काळजी घ्यावी लागते. मात्र, विरुद्ध दिशेने दुचाकी किंवा रिक्षा अचानक समोर आल्यास बसचालकांना ब्रेक लावून बस मागे-पुढे घ्यावी लागते. त्यामुळे मागील वाहनांच्या रांगा लागतात. याचा परिणाम बसच्या वेळापत्रकावर होऊन प्रवाशांनाही विलंब सहन करावा लागतो.

भर चौकात खुलेआम नियमभंग होत असतानाही वाहतूक पोलिसांची प्रभावी उपस्थिती अनेकदा दिसत नसल्याची नागरिकांची तक्रार आहे. सीसीटीव्ही आणि ई-चलन व्यवस्था उपलब्ध असतानाही वारंवार नियमभंग करणाऱ्यांवर कठोर कारवाई का होत नाही, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

रॉंग साईडने वाहन चालविणे हा केवळ वाहतूक कोंडीचा प्रश्न नसून गंभीर अपघाताला निमंत्रण ठरू शकतो. विशेषतः मोठ्या पीएमपी बस आणि दुचाकी किंवा रिक्षांमध्ये अचानक धडक होण्याची शक्यता असल्याने अपघात होण्यापूर्वीच प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याची गरज आहे.

विरुद्ध दिशेने वाहन चालविणाऱ्यांविरोधात विशेष मोहीम राबवून दंडात्मक कारवाई करण्यात येईल, असे वाहतूक पोलिसांनी स्पष्ट केले आहे. चौकांमध्ये वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी आवश्यक उपाययोजना आणि पोलिसांचा बंदोबस्त वाढविण्यात येणार आहे.

तसेच रॉंग साईडच्या ठिकाणी बॅरिकेड्स, दिशादर्शक फलक आणि रिफ्लेक्टर बसविण्याची मागणी नागरिकांनी केली आहे.

> “पीएमपी बस वळवताना सर्वात मोठी अडचण म्हणजे विरुद्ध दिशेने अचानक येणाऱ्या दुचाकी आणि रिक्षा. मोठी बस असल्यामुळे आम्हाला वाहन थांबवून वारंवार मागे-पुढे करावे लागते. त्यामुळे बसला उशीर होतो, वाहतूक कोंडी वाढते आणि प्रवाशांनाही नाहक त्रास सहन करावा लागतो. नियम पाळले तर ही समस्या मोठ्या प्रमाणात कमी होऊ शकते.”
>
> - पीएमपी बसचालक

> “अशा प्रकारे वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरोधात विशेष मोहीम राबवून दंडात्मक कारवाई करण्यात येईल. चौकातील वाहतूक सुरळीत राहण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना तसेच पोलिसांचा बंदोबस्त वाढविण्यात येईल. नागरिकांनीही काही क्षणांचा वेळ वाचविण्याच्या नादात स्वतःचा आणि इतरांचा जीव धोक्यात घालू नये.”
>
> - अमित डोळस, वरिष्ठ वाहतूक पोलीस निरीक्षक, पिंपरी-चिंचवड



## भूमिका

**नावातच राजेपण असलेले एक साहेब नुकतेच नाशिकनगरीत येऊन गेले आणि त्यांच्या आगमनाने दरबारी व्यवस्थेला पुन्हा एकदा जुन्या राजेशाहीची आठवण झाली. स्वागत कमानी, हार-तुरे, पुष्पगुच्छ, नाशिक ढोलाचा दणदणाट आणि 'बा अदब, बा मुलाहिजा, होशियार'च्या घोषणा अशा वातावरणात राजांचे आगमन झाले.**

# राजे आले, दरबार भरला; पण प्रजा उठून गेली!

राजांची गाडी कुठे वळते, ते कुणाकडे पाहतात, कुणाला हात दाखवतात, कुणाचे नाव घेतात, याचे अर्थ लावण्यात दरबारी व्यस्त झाले. अखेर दरबार भरला आणि राजांनी फर्मान काढले—'जेन झी'ला दरबारात बोलवा! सध्या 'जेन झी' म्हणजेच तरुण पिढी चर्चेचा आणि राजकारणाचा आकर्षणाचा केंद्रबिंदू आहे.

त्यामुळे त्यांच्या उपस्थितीने दरबाराला आधुनिकतेची झळाळी मिळेल, असा कदाचित दरबारींचा समज असावा. विद्यार्थ्यांना बोलावण्यात आले. काहींनी प्रश्न लिहून आणले, काहींनी सूचना तयार केल्या.

राजे आपले म्हणणे ऐकतील, प्रश्न समजून घेतील, चर्चा करतील आणि कदाचित काही ठोस निर्णयही होतील, अशी त्यांची अपेक्षा असणे स्वाभाविक होते.



पण संवाद सुरू होण्याआधीच संपला. उभ्याउभ्याच सुरू झालेला हा 'मुक्त संवाद' दहा-पंधरा मिनिटांत आटोपला. विद्यार्थ्यांनी प्रश्नांची वही उघडण्यापूर्वीच संवादाचे पुस्तक बंद झाले.

बाहेर पडलेल्या तरुणांना माध्यमांनी 'दरबार कसा झाला?' असा प्रश्न विचारला. त्यावर मिळालेले उत्तरच या संपूर्ण कार्यक्रमाचे वास्तव सांगून गेले—'शुरू होते ही खतम हो गया!' दरबारी मात्र खूश होते—'तरुणाईशी राजांचा मुक्त संवाद झाला!' तर तरुणांचा प्रश्न वेगळाच होता—'मुक्त संवाद नेमका कुठे झाला?'

याहून अधिक विसंगती म्हणजे राष्ट्रकुल स्पर्धेत देशाला सुवर्णपदक मिळवून देणारा नाशिकचा धावपटू दिलीप गावित आणि त्याचे प्रशिक्षक यांनाही या दरबारात बोलावण्यात आले होते. मैदानावर चित्त्याच्या वेगाने धावणाऱ्या या खेळाडूला मात्र राजदर्शनासाठी तासभर तिष्ठत ठेवण्यात आले. राजांच्या भेटीसाठी प्रतीक्षा करणे, हाच कदाचित सन्मानाचा भाग असावा, असा दरबारी समज असू शकतो. पण काळ बदलला आहे.

पूर्वी प्रजा राजांच्या निरोपाची वाट पाहत तासनतास बसून राहायची. आजच्या नागरिकाकडे घड्याळ आहे, काम आहे आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे स्वाभिमान आहे. त्यामुळे दिलीप गावित आणि त्याचे प्रशिक्षक 'सरावाची वेळ झाली' असे सांगून राजदर्शन न घेताच निघून गेले. ही घटना केवळ एका खेळाडूची नाराजी नाही; ती बदललेल्या मानसिकतेची खूण आहे. आजची तरुणाई केवळ फोटो काढण्यासाठी, घोषणा देण्यासाठी किंवा राजकीय कार्यक्रमाची शोभा वाढवण्यासाठी येत नाही. तिला प्रश्न विचारायचे आहेत, उत्तरे हवी आहेत आणि निर्णयप्रक्रियेत आपला आवाज ऐकला जावा, अशी अपेक्षा आहे. तिच्यासमोर रोजगार, शिक्षण, स्पर्धा परीक्षा, कौशल्य, महागाई आणि भविष्यातील असुरक्षितता यांसारखे असंख्य प्रश्न आहेत. अशा वेळी काही मिनिटांचा औपचारिक संवाद तिच्या अपेक्षा पूर्ण करू शकत नाही.

दरबार किती मोठा होता, किती हार-तुरे चढले, किती घोषणा झाल्या आणि किती छायाचित्रे प्रसिद्ध झाली, यापेक्षा महत्त्वाचे म्हणजे त्या दरबारात लोकांचे म्हणणे किती ऐकले गेले. कारण लोकशाहीत जनता प्रजा नसते आणि सत्ताधारी राजा नसतो. पूर्वी राजे उठले की दरबार संपायचा. आता मात्र चित्र बदलले आहे. प्रजा उठून निघून गेली की दरबार केव्हाच संपलेला असतो!

## प्रासंगिक »

### नम्रता

**एकदा अंधार पडला. सर्वत्र काळोख पसरला. तेव्हा असंख्य काजवे चमकू लागले. आपल्या प्रकाशामुळे पृथ्वी उजळून निघाली आहे, असा त्यांना गर्व झाला. 'आमच्याइतके तेजस्वी या जगात दुसरे कुणीच नाही,' असे ते मनात म्हणू लागले.**

काही वेळाने आकाशात चांदण्यांनी लुकलुकायला सुरुवात केली. असंख्य तारे पाहून काजव्यांना आपल्या प्रकाशाची मर्यादा जाणवली. आकाशातील ताऱ्यांसमोर आपले तेज किती क्षुल्लक आहे, याची जाणीव त्यांना झाली. त्यांचा गर्व नाहीसा झाला आणि ते नम्र झाले. थोड्याच वेळात चंद्र उगवला. चंद्राच्या शीतल प्रकाशाने संपूर्ण पृथ्वी उजळून निघाली. चंद्राला आपल्या तेजाचा अभिमान वाटू लागला. 'माझ्यासमोर हे तारे किती फिके आहेत!' असा विचार त्याच्या मनात आला.

पण काही वेळाने पूर्व दिशेला अरुणोदय झाला. सूर्याच्या आगमनाची चाहूल लागताच चंद्राचे तेज फिकट होऊ लागले. तेव्हा चंद्रालाही आपल्या सामर्थ्याची मर्यादा समजली. त्याचा गर्व नाहीसा झाला आणि तो नम्र झाला.

- तात्पर्य : **कितीही मोठे झालो तरी अहंकार न करता नम्र राहावे.**


नवी दिल्लीत जंतर-मंतरवर पेपरफुटीविरोधात आंदोलन करणाऱ्या तरुणांशी आधीच संवाद साधला असता, तर कदाचित ते आंदोलन करण्याची वेळच आली नसती.

# बरे झाले, खुद्द भागवत बोलले!

आंदोलन हा सरकारविरोधाचा शत्रुत्वपूर्ण मार्ग नसून सरकारला प्रश्न विचारण्याचा लोकशाहीतील एक महत्त्वाचा संवाद असतो. हेच वास्तव राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनी स्पष्ट शब्दांत मांडले, हे निश्चितच स्वागतार्ह आहे.

जेन-झी पिढीला देशविरोधी ठरवू नका, ती अधिक प्रामाणिक आहे, प्रश्न विचारते, तर्कांच्या आधारे विचार करते आणि तिच्या प्रश्नांना योग्य उत्तरे देण्याची गरज आहे, असे भागवत यांनी सांगितले. विशेष म्हणजे ही विधाने केंद्रासह अनेक राज्यांमध्ये सत्तेवर असलेल्या भारतीय जनता पक्षाला वैचारिक मार्गदर्शन करणाऱ्या संघाच्या प्रमुखांची आहेत. त्यामुळे त्यांच्या वक्तव्याचे महत्त्व अधिक आहे.

गेल्या काही महिन्यांत पेपरफुटी, परीक्षा व्यवस्थेतील गोंधळ आणि विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी संबंधित प्रश्नांवर तरुणाईने आवाज उठवला. मात्र त्यांच्या प्रश्नांना उत्तर देण्याऐवजी त्यांच्यावर संशय घेतला गेला.



आंदोलनामागे विदेशी शक्ती, पैसा किंवा राजकीय कट असल्याचे आरोप झाले. विद्यार्थ्यांच्या भाषेवर, संस्कारांवर आणि वर्तनावर चर्चा करण्यात आली; पण त्यांच्या मूळ प्रश्नांकडे दुर्लक्ष झाले.

लोकशाहीत सरकारला प्रश्न विचारणे हा गुन्हा नाही. उलट प्रश्न विचारणारी तरुणाई ही लोकशाहीच्या आरोग्याची खूण आहे. आजची पिढी वडीलधाऱ्यांचे प्रत्येक म्हणणे गप्प बसून स्वीकारत नाही. तिला कारण हवे असते, पुरावा हवा असतो आणि तर्कसंगत उत्तर हवे असते. त्यामुळे तिच्याशी दडपशाहीच्या भाषेत नव्हे, तर संवादाच्या भाषेत बोलणे आवश्यक आहे. या पार्श्वभूमीवर भागवत यांनी तरुणाईच्या बाजूने घेतलेली भूमिका सत्ताधाऱ्यांसाठी महत्त्वाचा संदेश आहे. सरकारवर टीका करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला देशद्रोही ठरविण्याची प्रवृत्ती लोकशाहीला कमजोर करते. मतभेद म्हणजे देशद्रोह नव्हे आणि आंदोलन म्हणजे राष्ट्रविरोध नव्हे.

भागवत यांच्या वक्तव्यामुळे सरकारसमर्थक मंडळींच्या भाषेत बदल होऊ लागला, तर त्याचे स्वागतच केले पाहिजे. मात्र एवढ्यावर भागवत किंवा संघाने थांबू नये. आंदोलनात सहभागी विद्यार्थ्यांना दबावाखाली आणणे, धमकावणे किंवा माफीनामे घेणे यासारख्या प्रकारांना आळा घालण्यासाठीही स्पष्ट भूमिका घेतली पाहिजे.शिक्षण, रोजगार, आरोग्य आणि स्पर्धा परीक्षांतील पारदर्शकता हे या पिढीचे खरे प्रश्न आहेत. या प्रश्नांवर ठोस काम झाले, तर आंदोलनांची गरजच कमी होईल. संवाद केवळ व्यासपीठावर नको; तो धोरणांमध्ये आणि कृतीतही दिसायला हवा. सोनाराने कान टोचले आहेत. आता सरकारने ते ऐकून घेतले, तरच या संवादाला खरा अर्थ प्राप्त होईल.

## ।। अभंगवाणी ।।



आहे तें सकळ कृष्णा चि अर्पण ।
न कळतां मन दुजें भावी ॥१॥

म्हणउनी पाठी लागतील भूतें ।
येती गवसीत पांचजणें ॥ध्रु.॥

- संत तुकाराम

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# बांबूच्या शेतीत विदर्भाचा डंका! यवतमाळ राज्यात नंबर १

## अमरावती, वाशिम, अकोला, बुलढाण्याचाही 'टॉप टेन'मध्ये समावेश

**महाईन्यूज । नागपूर**

**पर्यावरणातील कार्बन डायऑक्साइड मोठ्या प्रमाणात शोषून ऑक्सिजन उत्सर्जित करणाऱ्या बांबूच्या लागवडीत विदर्भाने राज्यात आघाडी घेतली आहे. यवतमाळ जिल्हा बांबू लागवडीत राज्यात प्रथम क्रमांकावर असून अमरावती, वाशिम, अकोला आणि बुलढाणा या जिल्ह्यांनीही पहिल्या दहामध्ये स्थान मिळविले आहे. बांबू लागवडीमुळे पर्यावरण संवर्धनासोबतच शेतकऱ्यांना उत्पन्नाचे पर्यायी साधन उपलब्ध होत असल्याने विदर्भातील शेतकरी या शेतीकडे मोठ्या प्रमाणात वळत आहेत.**



महाराष्ट्रात बांबू लागवडीला चालना देण्यासाठी राष्ट्रीय बांबू अभियान आणि अटल बांबू समृद्धी योजनेअंतर्गत विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. या योजनांना विदर्भातून मोठा प्रतिसाद मिळत असून लाभार्थी शेतकरी आणि लागवड क्षेत्राच्या बाबतीत विदर्भातील अनेक जिल्हे आघाडीवर आहेत.

महाराष्ट्र बांबू विकास मंडळाच्या जून २०२६मधील आकडेवारीनुसार, यवतमाळ जिल्ह्यात ९ हजार ३० शेतकऱ्यांनी तब्बल ३२ हजार ३३४.३५ एकर क्षेत्रावर बांबूची लागवड केली आहे. या कामगिरीमुळे यवतमाळने राज्यात पहिले स्थान पटकावले आहे. त्यानंतर पालघर, जालना, अमरावती आणि परभणी या जिल्ह्यांचा क्रमांक आहे.

बांबू लागवडीत अमरावती चौथ्या, वाशिम सहाव्या, अकोला आठव्या आणि बुलढाणा नवव्या क्रमांकावर आहे. त्यामुळे पहिल्या दहामधील चार जिल्हे विदर्भातील आहेत. नंदुरबार सातव्या, तर नांदेड दहाव्या क्रमांकावर आहे.


बांबू लागवडीमुळे शेतकऱ्यांना पारंपरिक शेतीसोबत उत्पन्नाचा अतिरिक्त स्रोत मिळू शकतो. शासनाकडून अनुदान, तांत्रिक मार्गदर्शन आणि प्रशिक्षण दिले जात आहे. मात्र, बांबू प्रक्रिया उद्योग, फर्निचर निर्मिती, बायोमास प्रकल्प आणि बाजारपेठेची साखळी अधिक मजबूत केल्यास या क्षेत्राला मोठी आर्थिक चालना मिळू शकते, असे तज्ज्ञांचे मत आहे.

बांबूला वाढती मागणी आणि विविध उद्योगांमध्ये होणारा वापर लक्षात घेता विदर्भात बांबू आधारित अर्थव्यवस्थेला मोठी संधी निर्माण झाली आहे. पर्यावरण संवर्धनासोबत शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्याचे साधन म्हणून बांबू शेतीकडे पाहिले जात असून, बांबू अर्थव्यवस्थेचा केंद्रबिंदू म्हणून विदर्भाची ओळख मजबूत होत आहे.

### बांबू शेतीत यवतमाळचा 'डंका'!

बांबू लागवडीत यवतमाळ जिल्हा राज्यात अव्वल ठरला असून ९ हजार ३० शेतकऱ्यांनी ३२ हजार ३३४ एकरांवर बांबूची लागवड केली आहे. विदर्भातील अमरावती, वाशिम, अकोला आणि बुलढाणा या चार जिल्ह्यांचाही राज्यातील पहिल्या दहामध्ये समावेश झाला आहे.

# गणेशोत्सवाआधी रत्नागिरीतील महामार्गाचे काम पूर्ण होणार



**महाईन्यूज । रत्नागिरी**

**गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर मुंबई-गोवा महामार्गाच्या रत्नागिरी जिल्ह्यातील उर्वरित कामांना वेग देण्यात आला असून, गणेशोत्सवापूर्वी ही कामे पूर्ण करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. गणेश चतुर्थीनिमित्त कोकणात मोठ्या संख्येने येणाऱ्या चाकरमान्यांना वाहतूक कोंडी आणि अपूर्ण कामांमुळे त्रास होऊ नये, यासाठी संबंधित यंत्रणांना कामे वेगाने पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. ही माहिती पालकमंत्री उदय सामंत यांनी शुक्रवारी (७ ऑगस्ट) रत्नागिरी येथे पत्रकार परिषदेत दिली.**

### गणेशोत्सवाआधी महामार्ग चकाचक!

मुंबई-गोवा महामार्गावरील रत्नागिरी जिल्ह्यातील उर्वरित कामे गणेशोत्सवापूर्वी पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. चिपळूणमधील उड्डाणपुलाचे ८० टक्क्यांहून अधिक काम पूर्ण झाले असून, चिपळूण-संगमेश्वरमधील काही पॅच आणि लांजा उड्डाणपुलाचे काम वेगाने सुरू आहे. त्यामुळे गणेशोत्सवासाठी कोकणात येणाऱ्या चाकरमान्यांना मोठा दिलासा मिळण्याची अपेक्षा आहे.

मुंबई-गोवा महामार्गाच्या चौपदरीकरणाचे काम टप्प्याटप्प्याने सुरू आहे. गणेशोत्सवाच्या काळात मुंबई, पुणे आणि राज्यातील अन्य भागांतून मोठ्या प्रमाणावर नागरिक कोकणात येतात. त्यामुळे महामार्गावरील वाहतूक मोठ्या प्रमाणात वाढते. अपूर्ण कामांमुळे वाहतुकीचा खोळंबा होऊ नये, यासाठी यंदा उर्वरित कामे गणेशोत्सवापूर्वी पूर्ण करण्यावर भर देण्यात आला आहे.

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील चौपदरीकरणाचे काम १०० टक्के पूर्ण झाले आहे. रत्नागिरी जिल्ह्यातील राजापूर आणि खेड तालुक्यांमधील कामही पूर्ण झाले आहे. त्यामुळे या भागातून प्रवास करणाऱ्या वाहनचालकांना मोठा दिलासा मिळण्याची शक्यता आहे.

चिपळूणमधील उड्डाणपुलाचे ८० टक्क्यांपेक्षा अधिक काम पूर्ण झाले असून उर्वरित काम वेगाने सुरू आहे. चिपळूण ते संगमेश्वरदरम्यान काही छोटे रस्ते भाग तसेच लांजा येथील उड्डाणपुलाचे काम बाकी आहे. ही कामेही गणेशोत्सवापूर्वी मार्गी लावण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

गणेशोत्सवादरम्यान चिपळूण, संगमेश्वर आणि लांजा परिसरात वाहनांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढते. त्यामुळे या भागातील अपूर्ण कामे लवकर पूर्ण झाल्यास वाहतूक कोंडी कमी होण्यास मदत होणार आहे. संबंधित यंत्रणांकडून मनुष्यबळ आणि यंत्रसामग्री वाढवून कामांना गती देण्यात येत आहे.

गणेश चतुर्थीसाठी मुंबई, पुणे आणि राज्याच्या विविध भागांतून मोठ्या संख्येने चाकरमानी कोकणात येतात. त्यामुळे महामार्गावरील वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी आवश्यक उपाययोजना आणि वाहतूक व्यवस्थापनावरही भर दिला जाणार आहे. उर्वरित कामे वेळेत पूर्ण झाल्यास यंदाच्या गणेशोत्सवात कोकणाकडे जाणाऱ्या प्रवाशांना मोठा दिलासा मिळण्याची अपेक्षा आहे.

रायगड जिल्ह्यातील माणगाव आणि इंदापूर येथील चौपदरीकरणाचे काम अद्याप बाकी आहे. त्यासाठी आवश्यक प्रक्रिया पूर्ण झाली असून, हे कामही वेगाने मार्गी लावण्याचे प्रयत्न सुरू असल्याचे सामंत यांनी सांगितले.

### चाकरमान्यांचा प्रवास होणार सुखकर!

गणेशोत्सवापूर्वी मुंबई-गोवा महामार्गावरील रत्नागिरी जिल्ह्यातील उर्वरित कामे पूर्ण करण्यासाठी प्रशासनाने गती वाढवली आहे. राजापूर आणि खेड तालुक्यांतील काम पूर्ण झाले असून, चिपळूण व लांजा येथील उर्वरित कामेही वेगाने सुरू आहेत.

# अमेरिकेने इराणपुढे हात टेकले?

## दीर्घकाळ युद्ध सुरू राहिल्यास आर्थिक आणि राजकीय संकट वाढण्याची भीती

**महाईन्यूज । वॉशिंग्टन**

**इराणविरोधातील लष्करी संघर्ष अधिक काळ सुरू राहिल्यास अमेरिकेसमोर लष्करी, आर्थिक आणि राजकीय अडचणी वाढण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प प्रशासनाने युद्धाचा स्पष्ट उद्देश आणि त्यातून बाहेर पडण्याची रणनीती निश्चित करावी, अशी मागणी अमेरिकेच्या राजकीय व सुरक्षा वर्तुळातून होत आहे. संघर्ष लांबत गेल्यास अमेरिकेच्या सैन्यावर वाढणारा ताण, युद्धाचा खर्च, आखाती देशांमधील अस्थिरता आणि तेलाच्या किमती यांचा थेट परिणाम अमेरिकेच्या अर्थव्यवस्थेवर होऊ शकतो.**



इराणविरोधातील कारवाईचा सुरुवातीचा उद्देश तेहरानची अण्वस्त्र क्षमता रोखणे आणि त्याच्या लष्करी सामर्थ्यावर आघात करणे हा असल्याचे अमेरिकेने स्पष्ट केले होते. मात्र संघर्ष पुढे सरकत असताना केवळ हवाई हल्ल्यांमधून अपेक्षित राजकीय परिणाम साधता येतील का, हा प्रश्न उपस्थित झाला आहे. दुसरीकडे, जमिनीवर मोठ्या प्रमाणावर सैन्य उतरवणे हा अमेरिकेसाठी अधिक जोखमीचा पर्याय ठरू शकतो. यामुळे अमेरिकेच्या लष्करी नेतृत्वासमोर एक महत्त्वाचा प्रश्न आहे—लष्करी कारवाईचा अंतिम उद्देश नेमका काय आहे? केवळ इराणची लष्करी क्षमता कमकुवत करणे, त्याचा अणुकार्यक्रम रोखणे, आखातातील जहाज वाहतूक सुरक्षित करणे की इराणच्या राजकीय व्यवस्थेत बदल घडवणे? प्रत्येक उद्दिष्टासाठी वेगवेगळी लष्करी आणि राजनैतिक रणनीती आवश्यक आहे. अमेरिकेच्या घटनात्मक व्यवस्थेनुसार दीर्घकाळ लष्करी कारवाई सुरू ठेवताना काँग्रेसची भूमिका महत्त्वाची ठरते.

युद्धाचा खर्च वाढत असल्याने आर्थिक परिणामांचाही मुद्दा पुढे आला आहे. संरक्षण क्षेत्रासाठी मोठ्या अतिरिक्त निधीची गरज निर्माण होऊ शकते. त्याचवेळी इंधनाच्या वाढत्या किमती आणि जागतिक पुरवठा साखळीवरील परिणाम अमेरिकेतील नागरिकांसाठी महागाईचा प्रश्न गंभीर करू शकतात.

इराण संघर्षाचा सर्वाधिक संवेदनशील परिणाम तेल बाजारावर होत आहे. आखाती भागातील वाहतूक आणि विशेषतः होर्मुझ सामुद्रधुनीच्या सुरक्षिततेबाबत निर्माण झालेली अनिश्चितता जगभरातील बाजारपेठांसाठी चिंतेचा विषय आहे. जगातील मोठ्या प्रमाणावर कच्च्या तेलाची वाहतूक या समुद्री मार्गातून होते.

### लष्करी कारवाईची मर्यादा स्पष्ट

अमेरिकेकडे अत्याधुनिक हवाई आणि क्षेपणास्त्र क्षमता असली तरी इराणसारख्या मोठ्या आणि भौगोलिकदृष्ट्या विस्तीर्ण देशाविरोधात दीर्घकाळ लष्करी मोहीम चालवणे सोपे नाही. इराणकडे क्षेपणास्त्रे, ड्रोन आणि विविध प्रकारच्या लष्करी यंत्रणा आहेत. त्याचबरोबर आखाती भागातील अमेरिकन तळ आणि मित्रदेशांवरील हल्ल्यांचा धोका कायम आहे. युद्धाचा कालावधी वाढत असताना अमेरिकेच्या काँग्रेसमध्येही चिंता वाढली आहे. काही खासदारांनी प्रशासनाकडे युद्धाचे उद्दिष्ट आणि संघर्ष संपविण्याचा मार्ग स्पष्ट करण्याची मागणी केली आहे.

## जंतर-मंतरवरील CJP च्या आंदोलनानंतर पंतप्रधान मोदींचं विद्यार्थ्यांना आवाहन

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**नीट पेपरफुटीविरोधात कॉक्रोच जनता पार्टीने जंतरमंतर येथे तीव्र आंदोलन केल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याविरोधातील रोष वाढला होता. या घटनेनंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज पहिल्यांदा जाहीर भाषण केलं. यावेळी त्यांनी तरुण पिढीच्या क्षमता आणि सामर्थ्यावर विश्वास व्यक्त केला. नवी दिल्लीतील नामांकित भारतीय तंत्रज्ञान संस्थेच्या (IIT) वार्षिक पदवीदान समारंभात पंतप्रधान नरेंद्र मोदी बोलत होते.**



“आमचा तुमच्यावर विश्वास आहे. देशाला तुमची गरज आहे”, असं पंतप्रधान मोदी म्हणाले. प्रत्येक पिढीची राष्ट्रीय जबाबदारी असते, असं सांगून तरुणांच्या उद्दिष्टांमध्ये देशाचा सर्वांगीण विकास समाविष्ट असला पाहिजे, असं त्यांनी सुचवलं. “तुम्हा सर्वांना माहीत आहे की प्रत्येक पिढीला त्यांच्या काळातील विशिष्ट आव्हानांना सामोरं जावं लागतं आणि त्यांची स्वतःची राष्ट्रीय जबाबदारीही असते. तुमच्या आयुष्यातील पुढील ३० ते ३५ वर्षांत तुम्ही जे काही कराल, त्याचा परिणाम आमच्या ‘विकसित भारत’च्या प्रवासावर होईल. त्यामुळे, तुम्ही घेतलेल्या प्रत्येक निर्णयाचा आधार हाच असावा, याचा देशाला कसा फायदा होईल? याद्वारे देशाची कोणती गरज पूर्ण होईल?” असं ते म्हणाले.

आजच्या वेगाने बदलणाऱ्या जगात तंत्रज्ञान अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावत असल्याचं पंतप्रधान मोदींनी सांगितलं. जे या बदलांशी जुळवून घेतील तेच अखेर जिंकतील, असं त्यांनी सुचवलं. “जागतिक धोरणात्मक समीकरणे वेगाने बदलत आहेत. तंत्रज्ञानाच्या प्रगतीच्या वेगामुळे जागतिक सत्तेचा समतोल प्रत्येक क्षणाला बदलत आहे. पुढील २० किंवा ३० वर्षांत जग कसं दिसेल हे कोणीही खात्रीने सांगू शकत नाही. जग, तंत्रज्ञान, उद्योग आणि व्यवसाय सर्वच बदलतील. पण या सगळ्यात एक गोष्ट लक्षात ठेवा, जे शिकत राहतील तेच यशस्वी होतील”, असं ते म्हणाले.

विद्यार्थ्यांना संबोधित करताना मोदींनी "आज जसा तुमच्या कुटुंबाला तुमचा अभिमान वाटत आहे, तसाच मलाही तुमच्या सर्वांचा खूप अभिमान आहे. अनेक विद्यार्थ्यांना त्यांच्या यशासाठी मेडल मिळालं आहे. मी तुम्हा सर्वांचे मनापासून अभिनंदन करतो. मात्र, यात आणखी काही मुली असत्या तर मला अधिक आनंद झाला असता. माफ करा, पण फक्त एक-दोन का? आणखी मुली असायला हव्या होत्या" असं म्हटलं आहे.

### नवी क्षेत्रे खुली करण्यात आली

स्कायरूटच्या ‘विक्रम-१’ रॉकेटच्या यशस्वी प्रक्षेपणाचा उल्लेख करत पंतप्रधानांनी अधोरेखित केलं की, सरकारने तरुणांना त्यांचं योगदान देण्यासाठी विविध मार्ग खुले केले आहेत. “आम्ही अनेक मार्ग खुले केले आहेत ज्याद्वारे आमचे तरुण योगदान देऊ शकतात. नवीन क्षेत्रे खुली करण्यात आली आहेत. मी यापूर्वी अंतराळ क्षेत्राबद्दल बोललो होतो. आज तेच अंतराळ क्षेत्र आमच्या तरुणांसाठी आकाश बनले आहे”, असं ते म्हणाले. आपल्या भाषणाला ‘जेन झी’ (GEN Z) चा स्पर्श देत पंतप्रधान मोदी म्हणाले, “आज आमचा तरुण म्हणत आहे, ‘माझ्या घराण्यात रॉकेट बनवणारा मी पहिलाच’. आज आमचा तरुण रॉकेट लॉन्च करत आहे. आमचे ड्रोन क्षेत्रही विस्तारत आहे. राष्ट्रीय सुरक्षेत आणि औषधांच्या वाहतुकीसाठी ड्रोनचा वापर केला जात आहे”, असंही त्यांनी स्पष्ट केलं.

# 'ईठा' सिनेमात मराठमोळ्या अभिनेत्रीची वर्णी



अभिनेत्री श्रद्धा कपूर 'ईठा' या सिनेमात लोकप्रिय तमाशासम्राज्ञी विठाबाई नारायणगावकर यांच्या भूमिकेत दिसणार आहे. 'ईठा' सिनेमाच्या टीझरनंतर श्रद्धा कपूरच्या भूमिकेचं सर्वत्र कौतुक होत आहे. चाहते अभिनेत्रीला विठाबाई नारायणगावकर यांच्या भूमिकेत पाहण्यासाठी उत्सुक आहे. श्रद्धा कपूरच्या या सिनेमात 'आई कुठे काय करते' मधील मराठमोळ्या अभिनेत्रीची वर्णी लागली आहे. अभिनेत्री राधा सागर 'ईठा'मध्ये झळकणार नाही. नुकत्याच दिलेल्या मुलाखतीत याबाबत राधा सागरने खुलासा केला. राधा सागरने सांगितले की, "लक्ष्मण उतेकर यांच्या 'ईठा' सिनेमाचा भाग होण्याची संधी मला मिळाली. या चित्रपटात मी एक भूमिका केली आहे. मी ऑडिशन दिली, लुक टेस्ट झाली आणि सिलेक्टही झाले. पण या सिनेमात माझे श्रद्धा कपूरसोबत सीन नाहीत. माझं सिनेमातलं जे कॅरेक्टर आहे, ती स्वतःचा ग्रुप घेऊन आलेली असते. मग आमच्यात स्पर्धा होते की काय होतं हे सिनेमात दिसेल. तिच्यासोबत माझे सीन्स नाहीत. पण आमची भेट झाली. ती फार गोड आहे. सिनेमा खूप कमाल आहे, नक्की बघा ", असेही तिने मुलाखतीत म्हंटले आहे. 'ईठा' सिनेमाचं दिग्दर्शन लक्ष्मण उतेकर यांनी केलं आहे. येत्या २८ ऑगस्टला हा सिनेमा सर्वत्र प्रदर्शित होणार होता. पण, यशच्या 'टॉक्झिक'मुळे 'ईठा' सिनेमाची रिलीज डेट बदलण्यात येणार असल्याचं बोललं जात आहे. राधा सागरच्या कामाबद्दल सांगायचं तर तिनं 'असे हे कन्यादान', 'सुंदरा मनामध्ये भरली', 'आई कुठे काय करते' यांसारख्या मालिकांमध्ये काम केलं आहे.




# मिथुन चक्रवर्तींची तब्येत बिघडली

बॉलिवूडचे ज्येष्ठ अभिनेते आणि भाजप नेते मिथुन चक्रवर्ती यांच्या प्रकृतीबाबत मोठी माहिती समोर आली आहे. प्रकृती अस्वास्थ्यामुळे त्यांना कोलकात्यातील एका खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले असून, त्यांच्यावर यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आली आहे. सध्या त्यांची प्रकृती स्थिर असून डॉक्टरांच्या देखरेखीखाली त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. मिथुन चक्रवर्ती यांच्या रुग्णालयातील उपचारांनंतर पश्चिम बंगालमधील विरोधी पक्षनेते शुभेंदु अधिकारी यांनी त्यांची भेट घेतली. भेटीनंतर त्यांनी सोशल मीडियावर पोस्ट करत अभिनेत्याच्या प्रकृतीबाबत माहिती दिली. त्यांच्या म्हणण्यानुसार, रात्री उशिरा मिथुन चक्रवर्ती यांच्यावर शस्त्रक्रिया करण्यात आली असून ती यशस्वी झाली आहे. सध्या त्यांची प्रकृती चांगली असून ते लवकर बरे व्हावेत, अशी प्रार्थना त्यांनी व्यक्त केली. शुभेंदु अधिकारी यांनी सांगितले की, शस्त्रक्रियेपूर्वी मिथुन चक्रवर्ती यांनी स्वतः त्यांच्याशी तसेच भाजपचे प्रदेशाध्यक्ष आणि खासदार सामिक भट्टाचार्य यांच्याशी संपर्क साधून माहिती दिली होती. मात्र, ही बाब सार्वजनिक व्हावी अशी त्यांची इच्छा नव्हती.



# आदिती राव हैदरीने शेअर केला रणबीरसोबत कामाचा अनुभव

बॉलिवूडमध्ये आपल्या विविधांगी भूमिकांमुळे अभिनेता रणबीर कपूर सतत चर्चेत असतो. सध्या तो बहुप्रितिक्षित रामायण या चित्रपटामुळे चर्चेत आहे. या चित्रपटाच्या ट्रेलरला जबरदस्त प्रतिसाद प्रेक्षकांकडून मिळाला असून, आता चित्रपटाच्या प्रदर्शनासाठी चाहते उत्सुक आहेत. या चित्रपटात रणबीर प्रभू श्री राम यांच्या भूमिकेत पाहायला मिळणार आहे. एकीकडे त्याच्या चित्रपटाची उत्सुकता असून दुसरीकडे रणबीर कपूरची प्रभू श्री राम यांच्या अवतारातील झलक समोर आल्यानंतर अनेकांनी नापसंती दर्शवली होती. याविषयी चर्चा सुरू असताना अभिनेत्री अदिती राव हैदरी हिने रणबीरसोबत काम करण्याचा अनुभव शेअर केला आहे. खरंतर रणबीरने आतापर्यंत अनेक कलाकारांसोबत स्क्रिन शेअर केली आहे. यामध्ये अभिनेत्री अदिती राव हैदरी हिचे देखील नाव येते. रॉकस्टार या चित्रपटात अदितीने रणबीरसोबत काम केले होते. अलीकडे दिलेल्या एका मुलाखतीत अभिनेत्रीने रणबीर कपूरसोबत काम करण्याचा तिचा अनुभव शेअर केला. रणबीर कपूरसोबत काम करण्याबद्दलचा आपला उत्साह व्यक्त करताना अदिती म्हणाली, "रणबीरसोबत काम करणे अप्रतिम होते. तो अप्रतिम आहे, खरंच अप्रतिम. तो माझ्या आवडत्या अभिनेत्यांपैकी एक आहे आणि तो कामाच्या वेळी पूर्णपणे त्यात रमून जातो. तो तुम्हाला कोणतीही गोष्ट पटवून देऊ शकतो." आदिती राव हैदरीचे बॉलिवूड चित्रपटांमधील काम पाहिल्यास तिने सतत साच्यापलीकडच्या भूमिका साकारल्या आहेत. तिच्या गांधी टॉक्स या चित्रपटातील साकारलेल्या भूमिकेतील अभिनयाचे कौतुक करण्यात आले होते. हा चित्रपट मूक डार्क कॉमेडी चित्रपट आहे. ती आता प्राईम व्हिडिओच्या 'वेलकम टू खोया महल' या मोठ्या प्रोजेक्टमध्ये एका वेगळ्या भूमिकेत चाहत्यांच्या भेटीला येणार आहे. कोंकणा सेन शर्मा आणि जयदीप सरकार यांनी निर्मित केलेल्या या आगामी मालिकेत बरुण सोबती आणि रचित सिंग या कलाकारांच्याही महत्वाच्या भूमिका आहेत. रामायण हा चित्रपट दोन भागांमध्ये प्रदर्शित होणार आहे. पहिला भाग दिवाळी २०२६ ला, तर दुसरा भाग दिवाळी २०२७ ला प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटात अभिनेता यश रावणाची भूमिका साकारत आहे. साई पल्लवी सीतेची आणि सनी देओल हनुमानाची भूमिकेत दिसणार आहे. रवी दुबे रामाचे भाऊ लक्ष्मण यांची भूमिकेत असून रकुल प्रीत सिंग शूर्पणखेच्या भूमिकेत असणार आहे.



# टीम इंडियाला मोठा धक्का

## अष्टपैलू वॉशिंग्टन सुंदर आणि कर्णधार शुभमन गिलही दुखापतग्रस्त; श्रीलंका मालिकेतून बाहेर

महाईन्यूज । नवी दिल्ली

**श्रीलंका दौऱ्यावरील दोन कसोटी सामन्यांच्या मालिकेपूर्वी भारतीय संघाला आणखी एक मोठा धक्का बसला आहे. संघातील स्टार फलंदाज साई सुदर्शन दुखापतीमुळे या मालिकेतून बाहेर पडला आहे. सुदर्शनच्या उजव्या पायाला स्ट्रेस फ्रॅक्चरची समस्या होती, ज्यातून तो अद्याप पूर्णपणे सावरू शकलेला नाही. वैद्यकीय पथकाच्या देखरेखीत त्याच्या प्रगतीत सुधारणा होत होती, परंतु त्याच्या पायाच्या अंगठ्याची वेदना पुन्हा उफाळून आल्याने त्याला या मालिकेतून माघार घ्यावी लागली आहे.**



साई सुदर्शनपूर्वी भारताचा स्टार वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराह देखील दुखापतीमुळे या मालिकेतून बाहेर झाला आहे. या दोघांची श्रीलंका दौऱ्यासाठी संघात निवड झाली असली तरी त्यांच्या तंदुरुस्तीबाबत साशंकता होती. आता साई सुदर्शनच्या जागी निवड समिती संघात कोणाला संधी देते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

भारतीय संघाची सध्या दुखापतग्रस्त खेळाडूंच्या समस्येने डोकेदुखी वाढवली आहे. बुमराह आणि सुदर्शन मालिकेबाहेर झाले असतानाच अष्टपैलू वॉशिंग्टन सुंदर आणि स्वतः कर्णधार शुभमन गिलही दुखापतीशी झुंजत आहेत. तसेच वॉशिंग्टन सुंदर दुखापतीमुळे मालिकेतील पहिल्या कसोटी सामन्यासाठी उपलब्ध असणार नाही. शुभमन गिल दुखापतीच्या कारणास्तव श्रीलंका क्रिकेट इलेव्हनविरुद्धच्या सराव सामन्यात मैदानात उतरला नव्हता. सराव सामन्यात संघ व्यवस्थापनाने गिलबाबत कोणताही धोका पत्करण्यास नकार दिला. एकामागून एक प्रमुख खेळाडू दुखापतग्रस्त होत असल्याने मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर यांच्या समोरील अडचणींमध्ये मोठी वाढ झाली आहे.

इंग्लंडविरुद्धच्या तिसऱ्या वनडेतून बाहेर पडल्यानंतर बुमराह 30 जुलै रोजी सेंटर ऑफ एक्सलन्समध्ये दाखल झाला. त्याच्या डाव्या गुडघ्याच्या सांध्यात समस्या निर्माण झाली आहे. त्यामुळे श्रीलंकेविरुद्धच्या कसोटी मालिकेतून त्याला बाहेर ठेवण्यात आले आहे. सध्या तो स्ट्रेंथ आणि कंडिशनिंगवर काम करत असून, त्याच्या पुनरागमनाची तारीख अद्याप निश्चित झालेली नाही.

हार्दिकला डाव्या मांडीच्या क्वाड्रिसेप्समध्ये दुखापत झाली होती. त्यानंतर त्याने स्किल-बेस्ड सरावात चांगली प्रगती केली होती. तो 80 ते 90 टक्के वेगाने आठवड्याला 12 ते 15 षटके गोलंदाजी करत होता. मात्र, यादरम्यान त्याच्या उजव्या शिनमध्ये वेदना सुरू झाल्या. तपासणीत गंभीर समस्या आढळली नाही. खबरदारीचा उपाय म्हणून त्याची धावण्याची प्रक्रिया थांबवण्यात आली होती; आता ती पुन्हा सुरू करण्यात आली आहे.

डाव्या मांडीच्या दुखापतीतून नितीश वेगाने सावरत असून त्याने 'रिटर्न टू स्किल्स' टप्प्यात प्रवेश केला आहे. मागील आठवड्यात त्याने 16 षटके गोलंदाजी केली. त्याचा धावण्याचा वेग वाढवण्याचे प्रशिक्षण सुरू आहे. सुदर्शनने फलंदाजी आणि क्षेत्ररक्षणाचा सराव सुरू केला आहे. त्याने नेट्समध्ये 75 मिनिटे फलंदाजी केली असून धावण्याचा सरावही केला आहे.

### वॉशिंग्टन सुंदर आणि गिलही दुखापतग्रस्त

उजव्या हॅमस्ट्रिंगच्या दुखापतीमुळे हर्षित सेंटर ऑफ एक्सलन्समध्ये आहे. 20 जुलै रोजी तो तेथे दाखल झाला. पुनर्वसनासोबतच त्याचा स्किल-बेस्ड सरावही सुरू करण्यात येत आहे. सुंदरच्या उजव्या हॅमस्ट्रिंगला दुखापत झाली आहे. त्याने जॉगिंग सुरू केली असून कंडिशनिंग एक्सरसाइजवर भर दिला जात आहे. त्याच्या स्ट्रेंथ आणि बॅलन्समध्ये सुधारणा दिसत आहे. आगामी काळात त्याचा वर्कलोड हळूहळू वाढवून पुनरागमनासाठी प्रयत्न केले जाणार आहेत. वरुणच्या डाव्या हॅमस्ट्रिंगला दुखापत झाली आहे. सध्या तो स्पॉट बॉलिंगमध्ये सहा षटके गोलंदाजी करत आहे.

# FIFA वर्ल्डकप: होम मेड बॉम्बने मेस्सीला उडवून देण्याचा होता कट

महाईन्यूज । नवी दिल्ली

**अर्जेंटिनाचा स्टार फुटबॉलपटू लिओनेल मेस्सीला नुकत्याच झालेल्या फिफा वर्ल्डकपवेळी टार्गेट करण्याचा कट होता अशी धक्कादायक माहिती समोर येत आहे. पोलिसांच्या डोसियरमध्ये मेस्सीला बॉम्बने उडवून देण्याचा प्लॅन असल्याचा दावा करण्यात आला आहे.**



सुरक्षा अहवालात देखील मेस्सी आणि इतर खेळाडूंना टार्गेट केले जाऊ शकतो अशी शक्यता वर्तवण्यात आली होती. स्पॅनिश आऊटलेट Informacion.es ने दिलेल्या माहितीनुसार अमेरिकेतील सुरक्षा एजन्सी आणि स्पर्धेत सहभागी झालेल्या देशातील अधिकाऱ्याचा एफबीआय समन्वय नेटवर्कशी संपर्क होता. ते टेरर अलर्टबाबत काम करत होते. पोलिसांनी सुरक्षेसंदर्भात दिलेल्या डोसियरमध्ये लिओनेल मेस्सी याच्याबाबत सर्वात जास्तवेळा धोक्याचा अलर्ट आला होता.

विशेष म्हणजे सर्वात मोठा थ्रेट हा डल्लासमधून आला. या ठिकाणी अर्जेंटिना आणि जॉर्डन यांनी सामना खेळला होता. डल्लास एअर पोर्टवर एका पुरुषाने संपर्क केला होता. त्याने दावा केला होता की तो आणि त्याचे अजून दोन सहकारी स्टेडियमच्या दिशेने होम मेड बॉम्ब आणि एआर-१५ घेऊन जात आहेत. या धोक्याचा इशारा पोलिसांना आणि दोन्ही संघातील खेळाडूंना देण्यात आला होता. मेस्सीचा यात विशेष उल्लेख करण्यात आला होता.

या डोसियरमध्ये अर्जेंटिना आणि इजिप्त यांच्यातील अटलांटा येथील सामन्यावेळी एक थ्रेट आला होता. त्यात एक एक्स युजरने मेस्सीसह संपूर्ण स्टेडियम आत्मघातकी स्फोटाचा हल्ला करून उडवून देण्याची धमकी दिली होती. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार मेस्सीला असलेला धोका हा ऑनलाईन मानहानीच्याही पुढे गेला होता.

### मेस्सीचे नाव टार्गेट म्हणून घेतले

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार मेस्सीला असलेला धोका हा ऑनलाईन मानहानीच्याही पुढे गेला होता. डल्लासमधील घटनेत तर फोन करणारा व्यक्ती आणि त्याचे दोन साथीदार हे स्टेडियमच्या दिशेने होम मेड बॉम्ब घेऊन जात असल्याचं सांगण्यात आलं होतं. त्यांनी खासकरून मेस्सीचे नाव टार्गेट म्हणून घेतले होते. दुसऱ्या एका घटनेत एक्स युजरने तो मेस्सीवर हल्ला करण्यासाठी चार बॉम्ब घेऊन जवळपास स्टेडियममध्ये पोहचलाच होता असा दावा केला होता.

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज ™

epaper.mahaenews.com

ePaper

। रविवार ।

दि. 09 ऑगस्ट 2026 ।

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## To The Point : मोशी दुर्घटनेनंतर 'राजकीय अँगल'चा खेळ

# कचरा प्रश्न मात्र वाऱ्यावर!

### कथित चाणक्यांच्या रणनीतीतून 'खांद्यावर बंदूक'



### उपायांऐवजी आरोप-प्रत्यारोपांना प्राधान्य

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**


**मोशी कचरा डेपोतील दुर्घटनेनंतर पिंपरी-चिंचवडच्या कचरा व्यवस्थापनाचा प्रश्न गंभीर झाला आहे. कचऱ्याचे ढीग, पर्यायी जागांचा शोध, वाहतुकीवरील ताण आणि नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला असताना, कचरा प्रक्रिया क्षमता कशी वाढवणार, नवीन जागा कुठे निश्चित करणार आणि दीर्घकालीन व्यवस्था काय असणार, यावर ठोस चर्चा होणे अपेक्षित आहे. मात्र, त्याऐवजी राजकीय आरोप-प्रत्यारोपांनाच अधिक हवा दिली जात असल्याचे चित्र आहे.**



दुर्घटनेनंतर काही विशिष्ट माध्यमांतील प्रतिनिधींना सोबत घेऊन घटनेला 'राजकीय अँगल' देण्याचा प्रयत्न झाल्याचा आरोप राजकीय वर्तुळातून केला जात आहे. दुर्घटनेची चौकशी आणि दोषींवर कारवाई आवश्यकच आहे; मात्र, त्याचवेळी शहराचा कचरा प्रश्न सोडविण्याची जबाबदारीही तितकीच महत्त्वाची आहे.

शहरात दररोज निर्माण होणाऱ्या कचऱ्यावर प्रक्रिया कुठे करणार? नवीन प्रकल्प कधी उभारणार? ओल्या कचऱ्याचे बायो-मिथेनेशन, RDF आणि उर्वरित कचऱ्याचे व्यवस्थापन कसे करणार? आगामी १० ते १५ वर्षांची प्रक्रिया क्षमता कुठून निर्माण करणार? या प्रश्नांची उत्तरे मात्र अद्याप ठोसपणे पुढे आलेली नाहीत.

### To The Point : खरा प्रश्न कचऱ्याचा!



मोशी दुर्घटनेची चौकशी होऊ द्या. दोषींवर कारवाई होऊ द्या. आर्थिक अनियमितता असेल तर तीही उघडकीस येऊ द्या. मात्र, नागरिकांना आरोप-प्रत्यारोप नकोत; त्यांना स्वच्छ शहर आणि शास्त्रोक्त कचरा व्यवस्थापन हवे आहे. राजकीय 'अँगल' शोधण्यात यश आले असेल; पण शहराचा कचरा प्रश्न सुटलेला नाही. आता खरा सवाल एकच—पिंपरी-चिंचवडच्या कचऱ्याचे पुढे काय?

### गैरव्यवहाराचा निष्कर्ष कसा?

मोशी बायो-मिथेनेशन प्रकल्पाच्या दरावरूनही आर्थिक गैरव्यवहाराचे आरोप होत आहेत. ३७५ TPD क्षमतेच्या प्रकल्पासाठी ३ हजार ६११ रुपये प्रतिटन दर अवाजवी असल्याचा दावा केला जातो. मात्र, ब्रह्मपुरम, कन्नूर आणि पालक्काड येथील तुलनात्मक दर अनुक्रमे ४ हजार ४२१, ४ हजार ७४० आणि ४ हजार ७९३ रुपये प्रतिटन असल्याचे नमूद केले जाते. त्यामुळे केवळ एका आकड्यावरून गैरव्यवहाराचा निष्कर्ष कसा?, हा प्रश्नही उपस्थित होतो. दरम्यान, समान बातमी आणि जवळपास समान कॅप्शन काही राजकीय पदाधिकाऱ्यांच्या सोशल मीडिया पोस्टवर दिसून आल्याने 'स्वतंत्र राजकीय भूमिका की तयार कथानकाची पुनरावृत्ती?' अशी चर्चा सुरू आहे. लोकप्रतिनिधींनी तांत्रिक प्रकल्पांवर भूमिका घेताना कागदपत्रांचा अभ्यास करून स्वतंत्र मत मांडणे अपेक्षित आहे.

### राजकारण की उपाययोजना?

दुर्घटनेची चौकशी आणि दोषींवर कारवाई आवश्यकच; मात्र, त्याचवेळी शहराचा कचरा प्रश्न सोडविण्यासाठी राजकीय नेतृत्वाने ठोस पर्याय मांडणेही तितकेच आवश्यक आहे. आरोप-प्रत्यारोपांपेक्षा 'कचरा व्यवस्थापनाचा रोडमॅप' हीच आता नागरिकांची अपेक्षा आहे.

### मोशी बायो-मिथेनेशन प्रकल्पात 'गैरव्यवहार'चा आरोप; आकडेवारी सांगते...

# ही तर 'सेटलमेंट'साठीची गोळाबेरीज!

## ₹३,६११ प्रतिटन दर तुलनात्मक प्रकल्पांपेक्षा कमी



## ५० TPD आणि ३७५ TPDची तुलना करून दिशाभूल करण्याचा प्रयत्न?

**महाईन्यूज | पिंपरी- चिंचवड**

**मोशी येथील प्रस्तावित बायो-मिथेनेशन प्रकल्पाबाबत काही पदाधिकाऱ्यांकडून 'आर्थिक गैरव्यवहार'चा आरोप केला जात आहे. मात्र, उपलब्ध तांत्रिक, आर्थिक आणि निविदा प्रक्रियेतील आकडेवारी पाहता जुन्या ५० TPD प्रकल्पाची आणि प्रस्तावित ३७५ TPD प्रकल्पाची थेट तुलना करणे योग्य ठरत नसल्याचे समोर येते.**

विद्यमान ५० TPD व्यवस्था प्रामुख्याने पूर्ववर्गीकृत हॉटेल व खाटीक कचऱ्यावर आधारित आहे. प्रस्तावित प्रकल्पात मात्र मिश्रित कचऱ्याच्या प्रक्रियेसाठी MRF, बायो-मिथेनेशन, Digester, ETP आणि ZLD यांचा समावेश आहे. त्यामुळे दोन्ही प्रकल्पांची क्षमता, तंत्रज्ञान आणि जबाबदाऱ्या वेगळ्या असताना केवळ प्रति टन दराची तुलना करून गैरव्यवहाराचा निष्कर्ष काढणे घाईचे ठरू शकते.

महापालिका हद्दीत दररोज सुमारे १,४०० ते १,५०० टन कचरा निर्माण होतो, तर प्रक्रिया क्षमतेत सुमारे ४०० ते ५०० TPDची तूट असल्याचे नमूद आहे. सेंद्रिय कचऱ्याचे प्रमाण सुमारे ५७३.७५ TPD असताना विद्यमान बायो-सीएनजी प्रकल्पाची क्षमता केवळ ५० TPD आहे. त्यामुळे वाढत्या कचऱ्याच्या पार्श्वभूमीवर मोठ्या क्षमतेच्या प्रकल्पाची गरज अधोरेखित होते.






प्रस्तावित प्रकल्पाचा प्रक्रिया दर ₹३,६११ प्रतिटन आहे. निविदेतील प्रारंभिक दर ₹४,२२० होता. वाटाघाटीनंतर तो ₹३,६११पर्यंत आणण्यात आला, म्हणजेच प्रति टन ₹६०९ची घट झाली. उपलब्ध माहितीनुसार निविदेत एकापेक्षा अधिक संस्थांचा सहभाग होता आणि तांत्रिक मूल्यांकन व समिती स्तरावर प्रक्रिया पार पडली. त्यामुळे 'एकतर्फी दर निश्चिती'चा दावा उपलब्ध प्रक्रियेतून सिद्ध होत नसल्याचे दिसते.

अनुदानाबाबतही प्रस्तावित ३७५ TPD प्रकल्पासाठी ₹४०.५० कोटी, तर जुन्या ५० TPD प्रकल्पासाठी ₹१२ कोटी देण्यात आले होते. प्रति TPD क्षमतेनुसार प्रस्तावित अनुदान जुन्या प्रकल्पापेक्षा निम्म्यापेक्षाही कमी असल्याचे आकडेवारीतून स्पष्ट होते.

### FACT CHECK : निष्कर्ष काय?

'आर्थिक गैरव्यवहार' हा गंभीर आरोप असून तो सिद्ध करण्यासाठी निविदा, तांत्रिक मूल्यांकन, करार, भुगतान, प्रकल्पाची कामगिरी आणि लेखापरीक्षणाची संपूर्ण साखळी तपासणे आवश्यक आहे. उपलब्ध आकडेवारीवरून सध्या गैरव्यवहार थेट सिद्ध होत नाही. तसेच ₹३,६११ प्रतिटन दर अवाजवी असल्याचा निष्कर्षही तुलनात्मक आकडेवारीवरून सिद्ध होत नाही. त्यामुळे खरी चर्चा 'दर किती?' एवढ्यावर न थांबता, 'किती कचऱ्यावर, कोणत्या तंत्रज्ञानाने आणि कोणत्या कराराच्या अटींवर प्रक्रिया होणार?' यावर होणे आवश्यक आहे.

# शहरातील खड्डे दोन दिवसांत बुजवा; आयुक्तांचे अधिकाऱ्यांना आदेश

**महाईन्यूज | पिंपरी- चिंचवड**

**शहरातील रस्त्यांवरील खड्डे तसेच नागरिकांच्या सुरक्षिततेशी संबंधित सार्वजनिक सुविधांच्या दुरुस्तीला महापालिका प्रशासनाने वेग दिला आहे. शहरातील रस्त्यांवरील खड्डे येत्या दोन दिवसांत बुजविण्याच्या दृष्टीने तातडीने कार्यवाही करा, असे स्पष्ट निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले आहेत.**



रस्त्यांवरील खड्ड्यांमुळे नागरिकांना होणारा त्रास आणि अपघातांचा धोका लक्षात घेता सर्व विभागीय कार्यकारी अभियंते, उपअभियंते आणि कनिष्ठ अभियंत्यांनी आपल्या कार्यक्षेत्राची नियमित पाहणी करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. नागरिकांच्या तक्रारींची प्रतीक्षा न करता प्रत्यक्ष पाहणी करून आवश्यक दुरुस्तीची कामे तातडीने हाती घ्यावीत, असेही निर्देश देण्यात आले आहेत.

प्रत्येक विभागीय कार्यकारी अभियंता, उपअभियंता आणि कनिष्ठ अभियंता यांच्या कार्यक्षेत्रातील रस्ते व सार्वजनिक सुविधांच्या देखभालीची जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे. संबंधित अधिकाऱ्यांनी आपल्या क्षेत्रातील कामांचे नियोजन, अंमलबजावणी आणि गुणवत्तेची तपासणी यावर विशेष लक्ष द्यावे. नागरिकांच्या सुरक्षिततेशी संबंधित कामांमध्ये दिरंगाई किंवा हलगर्जीपणा झाल्यास संबंधितांची जबाबदारी निश्चित करून नियमानुसार कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी दिला आहे. दुरुस्तीच्या कामांवर प्रभावी नियंत्रण ठेवण्यासाठी अतिरिक्त महापालिका आयुक्त, मुख्य अभियंता आणि सह शहर अभियंता यांनी संबंधित कामांचा नियमित आढावा घ्यावा, असे निर्देश देण्यात आले आहेत.

खड्डे दुरुस्ती, रेलिंग, दुभाजक आणि पदपथांच्या कामांची क्षेत्रीय कार्यालयनिहाय दररोज प्रगती तपासून त्याचा अहवाल आयुक्तांना सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

### खड्डे बुजविताना गुणवत्तेवर भर

खड्डे बुजविण्याची कामे केवळ तात्पुरती न करता दर्जेदार, टिकाऊ आणि सुरक्षित पद्धतीने करण्यात यावीत, यावर प्रशासनाने विशेष भर दिला आहे. दुरुस्तीच्या कामांमध्ये कोणत्याही प्रकारची हलगर्जीपणा किंवा निकृष्ट दर्जाचे काम होऊ नये, याची जबाबदारी संबंधित अधिकाऱ्यांवर निश्चित करण्यात आली आहे. रस्त्यांसोबतच शहरातील रेलिंग, दुभाजकांवरील बॅरिकेड्स, पदपथ आणि नागरिकांच्या सुरक्षिततेशी संबंधित इतर सार्वजनिक सुविधांची पाहणी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

# शहर भाजपाच्या मुख्य प्रवक्तेपदी राज दुर्गे

## संघटन बळकटीकरणासह विरोधकांच्या आरोपांना प्रत्युत्तर देण्याची जबाबदारी

महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड

**भारतीय जनता पार्टीच्या पिंपरी-चिंचवड शहर संघटनेच्या मुख्य प्रवक्तेपदी माजी नगरसेवक राज अनंत दुर्गे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. पक्षाची भूमिका प्रसारमाध्यमे आणि सोशल मीडियाच्या माध्यमातून प्रभावीपणे जनतेपर्यंत पोहोचविण्यासह विरोधकांकडून करण्यात येणाऱ्या आरोपांना वस्तुस्थितीच्या आधारे प्रत्युत्तर देण्याची महत्त्वपूर्ण जबाबदारी आता दुर्गे यांच्यावर सोपविण्यात आली आहे.**



भाजप पिंपरी-चिंचवड शहराध्यक्ष तथा नगरसेवक शत्रुघ्न (बापू) काटे यांच्या हस्ते दुर्गे यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. आगामी काळात शहरातील राजकीय घडामोडी, महापालिकेतील विकासकामे तसेच केंद्र व राज्य सरकारच्या विविध योजनांची प्रभावी मांडणी करण्यासाठी पक्षाच्या माध्यमिक आणि सोशल मीडिया संवादव्यवस्थेत दुर्गे यांची भूमिका महत्त्वाची ठरणार आहे.

नियुक्तीनंतर राज दुर्गे यांनी पक्ष नेतृत्वाचे आभार व्यक्त करत आगामी काळात मिळालेली जबाबदारी प्रभावीपणे पार पाडण्याचा निर्धार व्यक्त केला. “माझ्यासारख्या निष्ठावंत कार्यकर्त्यावर शहराध्यक्ष शत्रुघ्न (बापू) काटे आणि पक्ष नेतृत्वाने दाखविलेला विश्वास माझ्यासाठी अत्यंत मोलाचा आहे. भारतीय जनता पार्टीची ध्येय-धोरणे, विचारसरणी तसेच पिंपरी-चिंचवड शहरात झालेला विकास विविध प्रसारमाध्यमे आणि सोशल मीडियाच्या माध्यमातून प्रभावीपणे जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी पूर्ण ताकदीने कार्यरत राहीन. पक्षाची भूमिका ठामपणे मांडतानाच विरोधकांच्या चुकीच्या प्रचाराला तथ्यांच्या आधारे उत्तर देण्याचे काम केले जाईल,” असे दुर्गे यांनी सांगितले. राज दुर्गे यांच्या नियुक्तीमुळे आगामी काळात पिंपरी-चिंचवडच्या राजकीय पटलावर भाजपची भूमिका अधिक आक्रमकपणे मांडली जाण्याची शक्यता आहे.

### विकासकामे आणि पक्षाची भूमिका जनतेपर्यंत पोहोचविणार

राज दुर्गे हे अभ्यासू व्यक्तिमत्त्व, प्रभावी वक्ते आणि संघटनात्मक कामाचा अनुभव असलेले कार्यकर्ते म्हणून परिचित आहेत. त्यांच्या नियुक्तीमुळे पक्षाची बाजू अधिक आक्रमक आणि वस्तुनिष्ठपणे मांडण्यास मदत होणार असल्याचे पक्षाकडून सांगण्यात आले. यावेळी शत्रुघ्न (बापू) काटे म्हणाले, “राज दुर्गे हे अभ्यासू, प्रभावी वक्ते असून पक्षाची विचारधारा तळागाळातील कार्यकर्त्यांपर्यंत पोहोचविणारे धडाडीचे कार्यकर्ते आहेत. केंद्र व राज्य सरकारच्या धोरणात्मक निर्णयांची प्रभावी मांडणी करणे, महापालिकेच्या माध्यमातून शहरात झालेल्या विविध विकासकामांचा आलेख जनतेसमोर मांडणे आणि विरोधकांकडून करण्यात येणाऱ्या खोट्या प्रचाराला चोख प्रत्युत्तर देणे, यामध्ये त्यांची भूमिका महत्त्वपूर्ण ठरेल. त्यांच्या नियुक्तीमुळे पक्षाच्या संवादव्यवस्थेला निश्चितच बळ मिळेल.”

# जाधवाडीतील वडाचा मळा ते बोलाई मळा रस्ता समस्यांच्या विळख्यात!

महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड

**पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीतील जाधवाडी परिसरातील वडाचा मळा ते बोलाई मळा या मार्गावर नागरिकांना मूलभूत सुविधांसाठी मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. या परिसरातील गटारी वारंवार तुंबत असून सांडपाणी रस्त्यावर येत आहे. रस्त्याचीही मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाली असून, ठिकठिकाणी खड्डे पडले आहेत. त्यातच पथदिव्यांची व्यवस्था अपुरी असल्याने रात्रीच्या वेळी नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे.**





### ‘निधी नाही, ठेकेदार नाही’; प्रशासनाचे उत्तर

या समस्या सोडविण्यासाठी अधिकाऱ्यांशी संपर्क साधल्यानंतर ‘निधी उपलब्ध नाही आणि ठेकेदारही उपलब्ध नाही’, असे उत्तर दिले जात असल्याचा दावा विशाल आहेर यांनी केला. मात्र, नागरिकांकडून महापालिकेला नियमित कर मिळत असताना मूलभूत सुविधा देण्यासाठी निधी आणि यंत्रणा उपलब्ध नसणे ही गंभीर बाब असल्याचे त्यांनी म्हटले. गेल्या तीन महिन्यांपासून कोणत्याही प्रकारचे ठोस काम झालेले नाही, त्यामुळे प्रशासन नेमके कोणत्या कारणामुळे कामाला विलंब करीत आहे, असा सवालही आहेर यांनी उपस्थित केला आहे.

या समस्यांबाबत वारंवार महापालिका अधिकाऱ्यांकडे तक्रारी करूनही अद्याप ठोस कार्यवाही झालेली नसल्याचा आरोप राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे विशाल आहेर यांनी केला आहे. गेल्या तीन महिन्यांपासून परिसरातील परिस्थिती जैसे थे असून नागरिकांच्या तक्रारींकडे प्रशासन गांभीर्याने पाहत नसल्याचे त्यांनी म्हटले आहे.

वडाचा मळा ते बोलाई मळा परिसरात गटारी वारंवार तुंबत असल्याने नागरिकांना दुर्गंधी आणि अस्वच्छतेचा सामना करावा लागत आहे. पावसाळ्यात परिस्थिती आणखी गंभीर होत असून सांडपाणी रस्त्यावर येण्याची शक्यता निर्माण होत आहे. नियमित साफसफाई आणि आवश्यक दुरुस्ती करण्याची मागणी करूनही त्याकडे दुर्लक्ष होत असल्याचे आहेर यांनी सांगितले.

### रस्त्यावर खड्डेच खड्डे

या भागातील रस्त्याची अवस्था देखील खराब झाली आहे. रस्त्यावर ठिकठिकाणी मोठे खड्डे पडले असून वाहनचालकांना मोठी कसरत करावी लागत आहे. पावसामुळे खड्ड्यांमध्ये पाणी साचत असल्याने ते दिसून येत नाहीत. त्यामुळे दुचाकीस्वारांसह पादचाऱ्यांसाठीही हा मार्ग धोकादायक ठरत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. परिसरातील पथदिव्यांची अवस्था देखील बिकट असल्याचा आरोप करण्यात आला आहे. अनेक ठिकाणी दिवे बंद असून रात्रीच्या वेळी रस्त्यावर अंधाराचे साम्राज्य असते. त्यामुळे महिला, ज्येष्ठ नागरिक आणि विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे.

### नागरिकांच्या संयमाचा अंत पाहू नका

महापालिका प्रशासनाने जाधवाडीतील वडाचा मळा ते बोलाई मळा परिसरातील समस्या तातडीने सोडवाव्यात. गटारींची नियमित साफसफाई, रस्त्यावरील खड्ड्यांची दुरुस्ती आणि बंद पथदिवे तातडीने सुरू करावेत. केवळ आश्वासने न देता प्रत्यक्ष काम सुरू करावे, अशी मागणी विशाल आहेर यांनी केली आहे. “नागरिकांच्या मूलभूत सुविधांकडे दुर्लक्ष करून प्रशासनाने त्यांचा संयम पाहू नये. निधी आणि ठेकेदार उपलब्ध नसल्याचे कारण सांगून तीन महिने काम रखडवणे योग्य नाही. महापालिकेने तातडीने उपाययोजना करून नागरिकांना दिलासा द्यावा,” अशी भूमिका विशाल आहेर यांनी व्यक्त केली.

DTE Code
6310

Approved by AICTE | Accredited by NAAC | Accredited by NBA

PCET- NUTAN

# Nutan Maharashtra Institute of Engineering and Technology

Autonomous Institute | SPPU Affiliated

## Admissions Open for Academic Year 2026–27

| Degree | Programme Name | Choice Code | Intake |
|---|---|---|---|
| B.Tech | Computer Engineering (CE) | 631024510 | 240 |
| B.Tech | Computer Science Engineering (CSE) | 631024210 | 180 |
| B.Tech | Artificial Intelligence & Data Science (AI&DS) | 631099510 | 120 |
| B.Tech | Information Techanology (IT) | 631024610 | 120 |
| B.Tech | CSE Artificial Intelligence (CSE AI) | 631091310 | 60 |
| B.Tech | Electronics and Telecommunication (E&TC) | 631037210 | 120 |
| B.Tech | Mechanical Engineering | 631061210 | 120 |
| B.Tech | Electronics & Computer Engineering | 631084410 | 120 |
| M.Tech | Computer Engineering (CE) | 0631024510 | 12 |
| M.Tech | E&TC (IoT & Sensor System) | 0631095210 | 12 |
| BCA | Bachelor of Computer Applications (BCA) | 0631010110 | 120 |
| MBA | Master of Business Administration (MBA) | 0631010110 | 120 |
| MCA | Master in Computer Application (MCA) | 0631010110 | 120 |
| LL.B. | Bachelor of Laws | 26031 | 60 |
| B.Sc | Cyber and Digital Science (B.Sc) | - | 60 |
| B.Voc. | Bachelor of Vocation (B.Voc.) | - | 180 |

Highest Package for PCET-Nutan
**61 Lakh P.A.**

Average Salary Package
**5.5 Lakh P.A.**

For Admissions Contact:
**8830992988 / 7423080910 / 9028101155**




Scan the QR Code Today to Get More Information

Samarth Vidya Sankul, Vishnupuri, Talegaon Dabhade, Pune – 410507